|| श्री गणेशाय नमः ||

Astro • Puja • Vastu

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार


योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078

# वटसावित्री

## कथा, व्रत आणि पूजा



तुकाराम बुक डेपो. मुं.४

महाभारतकाळाच्या पूर्वीपासून चालत आलेले
परममंगल सौभाग्यव्रत

# वटसावित्री

## कथा, व्रत आणि पूजा
शास्त्रोक्त-पुराणोक्त

For Hariom Astrologers
Proprietor

लेखन-संपादन
अलंकार भारती
(भक्तकवी 'मिलिंदमाधव' यांचे शिष्य)

**किंमत १५ रूपये**

तुकाराम बुक डेपो
माधवबाग, मुंबई - ४०० ००४

सासर-माहेरचे कल्याण करणाऱ्या; पतिनिष्ठा, पतिव्रताधर्म या बलावर देवता या सन्मानीय उच्च पदावर आपले नाव सन्निविष्ट करून घेणाऱ्या; ब्रह्मा, विष्णू, महेश, इंद्र, वरुण, यम, अग्नी इत्यादी तेहतीस कोटी देवांनी जिचे दर्शन घेतले; बृहस्पती, व्यास, वाल्मीकी, वसिष्ठ, पराशर, विश्वामित्र, लोमश इत्यादी सहस्रावधी ऋषींनी माहात्म्य वर्णिले, त्याच सती सावित्री या देवीस्वरूप आदर्श पतिव्रतेचे उदात्तरम्य चरित्र; सौभाग्यरक्षण, सौभाग्यसंवर्धन करणारे वटसावित्री व्रत आणि पूजाविधी ह्यांची संपूर्ण शास्त्रोक्त-पुराणोक्त असामान्य माहिती देणारी आध्यात्मिक वाङ्मयातील लाभदायक शुभकारक सुबोध संहिता- **'वटसावित्री'**

**'तुकाराम बुक डेपो'** चे **श्रीमान मधुकर शिवराम कस्तुर शेठ** यांना मी आदरपूर्वक अर्पण करीत आहे. ही कृतज्ञता आहे.

अलंकार भारती



## वटसावित्री

वटसावित्री हे एक परममंगल व्रत आहे. महाराष्ट्रीय सौभाग्यवती स्त्रिया वटसावित्री पूजा मोठ्या प्रेमाने आणि भक्तिभावाने करतात.

स्त्रीजातीला सौभाग्याइतके मंगलत्व दुसऱ्या कशातही आढळत नाही. सौभाग्य हेच स्त्रीचे सर्वस्व असते. हे सौभाग्य पतीपासून प्राप्त होते म्हणून वटसावित्रीची पूजा सुवासिनी मनोभावे श्रद्धेने करून आपल्या पतीला उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभावे, आपले सौभाग्य अखंड राखावे, सासर-माहेर या दोन्ही कुळांचे मंगल व्हावे अशी प्रार्थना देवी सावित्रीकडे करतात.

वटपौर्णिमा म्हणजे ज्येष्ठ शु. पौर्णिमा. या दिवशी सौभाग्यकांक्षिणी आणि सौभाग्यवती स्त्रियांनी वटसावित्रीची पूजा करावयाची असते.

वटसावित्री हे एक सौभाग्य व्रत आहे. हे व्रत अत्यंत प्रभावी असून शुभकारक, लाभदायक, सौभाग्यरक्षण व सौभाग्यसंवर्धन करणारे आहे. पुत्रवती बनवणारे आहे. यश, आनंद, कीर्ती, सुख, ऐश्वर्य-वैभव प्राप्त करून देणारे आहे. सुवासिनींच्या मंगल पवित्र भावनांवर हे व्रत अधिष्ठित आहे. आपल्या पतीचे प्रेम कायम राहावे, आपला पती आरोग्यवान, आयुष्यवान, भाग्यवान बनावा या पतिव्रतांच्या कोमल भावना या व्रताशी अगदी निगडित झालेल्या आहेत. हे व्रत आणि वटसावित्री पूजा सौभाग्यवती स्त्रिया मोठ्या निष्ठेने, अत्यंत उत्साहाने प्राचीन काळापासून करीत आल्या आहेत. नवविवाहित युवतीदेखील वटसावित्री पूजा अतिशय प्रेमाने करीत असतात. त्यांना वटसावित्री पूजेचे आकर्षण वाटत असते.

वडाची फांदी तोडत असताना ती सत्यवानाच्या मस्तकावर जोराने आपटून तो जमिनीवर कोसळला. यमधर्म सत्यवानाचे प्राण नेण्याकरिता स्वतः आला. सावित्री महान पतिव्रता होती, पुण्यवान होती म्हणून यमधर्म तिच्या दृष्टीस पडला. सावित्री त्याच्यामागून जाऊ लागली. तिचे पतिप्रेम, पतिभक्ती, पतिनिष्ठा, पतिव्रताधर्माने तिने केलेली पतिसेवा या बळावर तिने सत्यवानाचे प्राण यमधर्माकडून परत मिळविले. तो वटवृक्ष ह्या घटनेचा साक्षीदार होता. म्हणून ह्या पूजेत वटवृक्षाचा समावेश केलेला आहे. सावित्रीने सत्यवानाच्या शरीराला स्पर्श करताच तो उठून बसल्यावर तिने त्या वटवृक्षाची पूजा केली. 'आजच्या या दिनी ज्या पतिव्रता स्त्रिया वटवृक्षाची पूजा करतील त्यांच्या पतींना उदंड आयुष्य लाभेल. त्यांचे सौभाग्य अखंड राहील. त्या पुत्रवती बनतील,' असे उद्गार सावित्रीने काढले. तेव्हापासून वटसावित्री पूजा करण्याची प्रथा सुरू झाली. वटवृक्ष हा वंशविस्ताराचा द्योतक आहे.

सावित्री ही दृढनिश्चयी, स्वाभिमानी पतिव्रता स्त्रीजातीचा महान आदर्श आहे. म्हणून हे व्रत, ही पूजा करून आनंदी, सुखी व्हावे.

वटसावित्री आपणावर प्रसन्न होवो.

-अलंकार भारती

डी-१०/७२, राजावाडी,
विद्याविहार (पूर्व),
मुंबई - ४०० ०७७



## सत्यवान-सावित्री कथा

फार प्राचीन काळी भद्र देशाचा अश्वपती या नावाचा एक राजा होता. त्याला काहीच अपत्य नव्हते. त्याने सावित्री देवीची आराधना केली. देवीच्या कृपाप्रसादाने त्याला एक कन्या झाली. राजाने आपल्या त्या कन्येचे नाव सावित्री ठेवले.

सावित्री रूपवान होती. ती उपवर झाल्यावर तिला योग्य वर मिळवण्यासाठी राजाने खूप प्रयत्न केला. परंतु तिच्या मनासारखा वर मिळत नव्हता. अखेर राजाने तिलाच आपल्या इच्छेप्रमाणे वर निवडण्यास सांगितले. तेव्हा ती आपल्यासोबत सैन्य घेऊन बरेच देश फिरली. त्यांत शाल्व देशाचा राजा द्युमत्सेन याचा पुत्र सत्यवान याला पाहून त्याच्याशी लग्न करण्याचा तिने निश्चय केला. तिने परत येऊन आपल्या पित्यास आपण सत्यवान या रूपसंपन्न पराक्रमी राजकुमारास वरले असल्याचे सांगितले. अश्वपती राजाला ते ऐकून अत्यंत आनंद झाला. तेवढ्यात नारदमुनी तिथे आले. राजाने मुनिवर्यांना ते वर्तमान सांगितले. यावर नारदमुनी म्हणाले, "द्युमत्सेन राजाला राज्य नाही. त्याचे राज्य त्याच्या भाऊबंदांनी हिरावून घेऊन, त्याच्या परिवारास अरण्यात हाकलून दिले आहे. शिवाय राजाचे डोळे गेलेले आहेत. राजकुमाराचे रूप हिच्या मनात भरले असेल, परंतु आपणाला हा संबंध उपयोगी नाही!"

नारदमुनींचे हे उद्गार ऐकून राजाने सावित्रीला स्पष्टपणे सांगितले की, "तू निवडलेला तो राजपुत्र आमच्या तोलामोलाचा नाही. तुला योग्य असा नाही! तू दुसऱ्या वराची निवड कर." यावर सावित्रीने

सांगितले, "सत्यवानाला मी मनापासून वरले आहे. त्याच्याशिवाय दुसरा पुरुष वरावा असा विचार माझ्या मनात कधीच येणार नाही."

"सावित्री, एक वर्षाने सत्यवान मृत्यू पावणार आहे. अशा अल्पायुषी युवकाशी लग्न केल्याने दुःखी होशील तू! माझे ऐक! तू त्यावाचून दुसरा पुरुष वरण्याचा विचार कर!" नारदमुनी म्हणाले

"नाही, तो विचार माझ्या मनात कधीच येणार नाही. जर माझ्या नशिबी वैधव्य असेल, तर ते कुणाशीही लग्न केल्याने प्राप्त होईलच; परंतु तसे नसेल तर सत्यवानाचे मरण तरी चुकेल," सावित्रीने सांगितले.

सावित्रीचा सत्यवानशी लग्न करण्याचा निश्चय ऐकून नारदमुनींनी रुकार दिला. "ही महान पतिव्रता होईल! जगात अजरामर होईल!" असे उद्गार जाताना त्यांनी काढले. नंतर अश्वपती राजाने द्युमत्सेनची भेट घेतली आणि सावित्रीचे सत्यवानाशी लग्न लावून दिले.

लग्न झाल्यानंतर सावित्री आपले सासूसासरे व पतीबरोबर त्याच अरण्यात राहू लागली. तिने सासूसासऱ्यांची व पतिव्रताधर्माने आपल्या पतीची सेवा केली. त्यामुळे सर्व देव तिच्यावर संतुष्ट झाले. त्या पतिव्रतेचे दर्शन घेण्यासाठी ते सारे देव प्रयत्न करीत असत.

नारदमुनींनी सांगितलेला तो दुःखाचा दिवस जवळ येऊन ठेपला. तिला चिंता वाटू लागली. पतीच्या मृत्युदिवसाच्या पूर्वी तीन दिवस तिने काहीच भक्षण न करता अनशनव्रत केले. चौथ्या दिवशी त्याला मरण येणार हे भविष्य तिला माहीत होते.



त्या दिवशी लाकडे आणण्यासाठी तो रानात जाऊ लागला. तेव्हा सासूसासऱ्यांची आज्ञा घेऊन तीदेखील त्याच्याबरोबर निघाली.

ती दोघे दिवसभर रानात हिंडली. परंतु त्यांना पुरेशी लाकडे मिळाली नाहीत. तेव्हा ती दोघे कष्टी बनून एका वडाच्या झाडाखाली बसली.

सावित्री मनात एकसारखे ईश्वराचे नामःस्मरण करीत होती. वारवार सत्यवानाकडे पाहत होती. ती अतिशय घाबरली होती.

हळूहळू काळोख पडू लागला. सत्यवान वडाच्या एका फांदीवर घाव मारू लागला. तोच ती फांदी त्याच्या मस्तकावर जोराने आपटून तो कोसळला. सावित्रीने हंबरडा फोडला. शोक केला.

तो पौर्णिमेचा दिवस होता. तिला ती काळरात्र भासली.

स्वच्छ चांदणे पडले होते. यमराज तिथे आला. सत्यवानाचे प्राण घेऊन तो दक्षिण दिशेस जाऊ लागला.

सावित्रीने उठून नमस्कार केला आणि विनयपूर्वक विचारले, "महाराज, कोण आपण?" यावर यमराज म्हणाला, "मी यमधर्म आहे! तू महान पतिव्रता आहेस म्हणून तुझ्या पतीचे प्राण नेण्याकरिता मी स्वतः आलो आहे. तू पुण्यवान असल्यामुळे मी तुझ्या दृष्टीस पडलो."

यमराज पुढे चालला तशी सावित्रीसुद्धा त्याच्यामागून जाऊ लागली. त्याने तिला परत जाण्यास सांगितले, तिची समजूत घातली. तरीही ती मागे फिरली नाही. तिची निस्सीम पतिभक्ती,

उज्ज्वल प्रशंसनीय पतिनिष्ठा व आलैकिक त्यागवृत्ती पाहून, यमराजाने तिला पतीच्या प्राणावाचून दुसरा काहीही वर माग, असे म्हटले. तेव्हा तिने आपल्या सासऱ्याला दृष्टी द्यावी असा वर मागितला. 'तथास्तु' असे म्हणून यमराज पुढे निघाला, तरीही ती परत फिरेना म्हणून त्याने तिला आणखी एक वर माग असे सांगितले. सावित्रीने दुसऱ्या वराने सासऱ्याला राज्यप्राप्ती, तिसऱ्या वराने निपुत्रिक पित्याला पुत्रप्राप्ती व चौथ्या वराने आपणास ह्याच जन्मात अखंड सौभाग्य व पुत्रलाभ व्हावा असे मागितले.

''तू सत्यवानाच्या शरीरास स्पर्श करताच तो जिवंत होईल. तुझ्या पित्यास पुत्रलाभ होईल. तुलाही पुत्रसंतती होईल. तुमचे गेलेले राज्य परत तुमच्या हाती येईल,'' इतके बोलून यमधर्म गुप्त झाला.

स्वर्गातील देव ते दृश्य पाहत होते. देवांनी स्वर्गातून सावित्रीवर पुष्पवृष्टी केली.

सावित्रीने धावत जाऊन सत्यवानाच्या शरीरास स्पर्श करताच तो खडबडून जागा होऊन उठून बसला.

''सावित्री, मी झोपलो असताना एक भयानक पुरुष येऊन मला ओढून घेऊन जाऊ लागला. परंतु तू त्याच्याकडे गेलीस, त्याच्याशी बोललीस, त्याने हात उंचावून तुला आशीर्वाद दिला आणि मला सोडून दिले. मी त्या स्वप्नात होतो. तू येऊन मला जागं केलंस!'' सत्यवान म्हणाला.



''ते स्वप्न नव्हतं. ते सत्य होतं!'' सावित्रीने सर्व वर्तमान सत्यवानास सांगितले.

''सावित्री... मी अल्पायुषी असल्याचं भविष्य मला माहीत होतं; परंतु तू आपल्या पातिव्रत्याच्या प्रभावानं यमधर्माकडून माझे गेलेले प्राण परत आणलेस. धन्य आहेस तू!'' सत्यवान उद्गारला.

''नाथ, यमधर्माकडून मी आणखी काही वर मागून घेतले आहेत. सासर-माहेर या दोन्ही कुळांसाठी पुष्कळसं काही केलं आहे. तुम्हांला त्याचा प्रत्यय येईलच!'' सावित्री म्हणाली.

सावित्रीने वटवृक्षाची मनोभावे पूजा केली. त्याच्यासमोर ही घटना घडली होती. वटवृक्षाला प्रदक्षिणा घालून तिने नमस्कार केला. नंतर ती दोघे घरी गेली. सावित्रीने यमाकडून मिळवलेल्या वरामुळे तिच्या सासऱ्याला चांगले दिसू लागले. त्यामुळे त्याला अतिशय आनंद झाला. परंतु लाकडे आणण्यास रानात सत्यवान व सावित्री गेले, ते अजून परत कसे आले नाहीत म्हणून त्यांना काळजी वाटू लागली होती. इतक्यात त्यांनी सत्यवान व सावित्री यांना येताना पाहिले. रानातून येण्यास विलंब का लागला, असे त्यांनी विचारल्यावरून सावित्रीने त्यांना घडलेली सर्व हकिकत सांगितली. ती ऐकून त्यांना परमहर्ष झाला.

काही क्षणांनंतर घोड्यांच्या टापाचा आवाज ऐकू येऊ लागला. द्युमत्सेन राजाच्या जयजयकाराने सारे आसमंत दुमदुमू लागले. वाद्ये वाजू लागली. ते सर्व जण बाहेर येऊन पाहतात तोच त्यांच्या राज्याचा प्रधान, सेनापती व सैन्य तिथे येऊन पोहोचले. त्यांचे राज्य हिरावून घेतलेल्या शत्रूला जिंकून द्युमत्सेन राजा आणि

त्याच्या परिवारास राज्यात घेऊन जाण्यासाठी ते तिथे आले होते. सावित्रीच्या पुण्याईने तिने यमधर्माकडून मिळवलेल्या वरप्रसादामुळे हे सारे घडून आले होते.

द्युमत्सेन राजाचा सर्व परिवार, सत्यवान व सावित्री या सर्वांना रथात बसवून वाजतगाजत मिरवणुकीने सन्मानपूर्वक त्यांनी शाल्व देशात नेले. सत्यवानाला राज्याच्या सिंहासनी बसविले.

सावित्रीचे पिताश्री राजा अश्वपती राज्यारोहण समारंभास उपस्थित राहिले आणि त्यांनी राजा सत्यवान व राणी सावित्रीदेवी यांना नजराणा दिला. राजा अश्वपतीला पुत्रप्राप्ती झाली.

पतिव्रताधर्मामुळे सावित्री अखंड सौभाग्यवती, पुत्रवती बनली. पातिव्रत्याच्या सामर्थ्यावर तिने पितृकुळाचा व पतिकुळाचा नावलौकिक वाढवला; उद्धार केला. सावित्री स्त्रीजातीचा आदर्श बनली. जगात अजरामर झाली.

ही कथा पांडव तीर्थयात्रा करीत असताना लोमश ऋषींनी धर्मराजाला सांगितली. 'श्री पांडवप्रताप' या महान ग्रंथाच्या अठ्ठाविसाव्या अध्यायात ही कथा आली आहे.

* * *

**वटसावित्री पूजेच्या वेळी ही कथा वाचावी. सावित्रीचे ध्यान करावे. कल्याण प्राप्त होईल. वटसावित्री पूजनाने सौभाग्यवतींच्या जीवनात दिव्यत्व येते, म्हणूनच ही पूजा युगे-युगे चालत राहिलेली आहे.**



## वटसावित्री पूजा

वटसावित्रीची पूजा वडाच्या विशाल वृक्षाच्या बुंध्याशी जाऊन भक्तिभावे करावी. वडाला पाच वेळा प्रदक्षिणा घालून दोरा गुंडाळावा आणि पूजेसाठी पाटावर बसावे. जर हे शक्य झाले नाही, तर वटसावित्री पूजा घरात करावी. एका पाटावर किंवा चौरंगावर वडाची ताजी फांदी एका भांड्यात तांदूळ घालून ठेवावी. (वृक्षांच्या फांद्या तोडणे पर्यावरणाच्या दृष्टीने हानिकारक असल्यामुळे वटवृक्षाच्या प्रतिमेचे पूजन करावे.)

पूजेच्या दिवशी नवीन साडी नेसावी. हळदकुंकू लावून घ्यावे. नथ वगैरे सौभाग्य अलंकार धारण करावेत. देव, घरातील वडील मंडळी यांना नमस्कार करून पूजेला बसावे. पूजासाहित्य जवळच तयार ठेवावे.

पूजेसाठी ब्राह्मण गुरुजी मिळाले नाहीत तर सुवासिनींनी हे व्रत व पूजा यथाविधि, यथासांग या पुस्तकावरून करावी. या पुस्तकाप्रमाणे सशास्त्र, पौराणिक मंत्रांनी उपचार समर्पण करून, पूजन करून सात्त्विक आनंद मिळवावा. सत्यवान-सावित्री कथा स्वतः वाचावी. दिवसभर उपास करावा. दूध व फलाहार घेण्यास हरकत नाही.

**एका वडाच्या पानवर केळे, आंबा इत्यादी फळे असलेले सौभाग्यवायन व 'वटसावित्री'ची एक एक प्रत कुंकू, अक्षता, फूल वाहून इतर सुवासिनींना द्यावी. नमस्कार करावा. पाच, अकरा, एकवीस यांप्रमाणे प्रती वाटाव्यात.**

पूजेला प्रारंभ करताना समई प्रज्वलित करावी. निरांजन पेटवावे.

## पूजासाहित्य -

हळद, कुंकू, सिंदूर, कापूर, उदबत्ती अष्टगंध, अत्तर, कार्पास वस्त्रे २ (एक २१ मण्यांचे व एक सात मण्यांचे), यज्ञोपवीत (जानवे), सुगंधी तेल, कुंकुममिश्रित अक्षता, खोबऱ्याची वाटी, गूळ, विड्याची पाने १०, नारळ १, सुपाऱ्या ५, समई, वात, निरांजन, धूपारती, विडा, पंचामृत (दूध, दही, तूप, मध, साखर) ताम्हन, संध्येची पळी, तांब्या, भांडे, उदबत्तीचे भांडे, काडवाती, कापूरारती, काजळ, गुलाल, रांगोळी, आंबा, केळी इत्यादी फळे. खारका, बदाम, कापूर, पाट किंवा चौरंग. गोडे तेल, काड्याची पेटी, सुपली, पूजेचे ताट, सौभाग्य अलंकार, काचेच्या हिरव्या बांगड्या, मंगळसूत्र, बेल, फुले, तुळशी, दूर्वा, तांदूळ, खण, कपडा इत्यादी. सुट्टी नाणी, हात पुसण्यास रुमाल, नैवेद्यासाठी वाटी.

## नियम -

पूजेला पूर्वाभिमुख बसावे. पूजेचे साहित्य तांब्याचे असावे. पूजेच्या वेळी इतर भाषण करू नये. फुले हलकेच वाहावीत. उडवू नयेत. विड्याची पाने उताणी व डेख देवीकडे करून देवीसमोर ठेवावी, वर सुपारी ठेवावी. नारळाची शेंडी देवीकडे करून तो ठेवावा. तुपाचा दिवा (निरांजन) उजव्या बाजूस ठेवावा.

अर्घ्य म्हणजे गंधपुष्प व अक्षता. अक्षता म्हणजे कुंकुममिश्रित तांदूळ. देवीला लाल व पिवळी सुगंधित फुले प्रिय आहेत.

घरी पूजा केली असेल तर पूजा आटोपल्यावर वडाची फांदी किंवा वटवृक्षाची प्रतिमा, आणि देवाला वाहिलेली फुले हे जलाशयात किंवा वाहत्या पाण्यात सोडावे.



## अथः पूजा प्रारम्भः

पूजेसाठी आसनावर बसल्यावर प्रथम स्वतःच्या कपाळावर कुंकू लावावे व पूजेला प्रारंभ करावा.

भांड्यातील पाणी एकेक पळी उजव्या तळहातावर घेऊन **ॐ केशवाय नमः । ॐ नारायणाय नमः । ॐ माधवाय नमः ।** या नामांचा उच्चार करून ते प्राशन करावे. **ॐ गोविंदाय नमः ।** या नामाने एक पळी पाणी ताम्हनात सोडावे. असे दोनदा करून मग म्हणावे -

**ॐ विष्णवे नमः । ॐ मधुसूदनाय नमः । ॐ त्रिविक्रमाय नमः । ॐ वामनाय नमः । ॐ श्रीधराय नमः । ॐ हृषीकेशाय नमः । ॐ पद्मनाभाय नमः । ॐ दामोदराय नमः । ॐ संकर्षणाय नमः । ॐ वासुदेवाय नमः । ॐ प्रद्युम्नाय नमः । ॐ अनिरुद्धाय नमः । ॐ पुरुषोत्तमाय नमः । ॐ अधोक्षजाय नमः । ॐ नारसिंहाय नमः । ॐ अच्युताय नमः । ॐ जनार्दनाय नमः । ॐ उपेन्द्राय नमः । ॐ हरये नमः । ॐ श्रीकृष्णाय नमः ।**

नंतर हात जोडून देवतावंदन करावे.

**ॐ श्रीमन्महागणपतये नमः । इष्टदेवताभ्यो नमः । श्रीगुरुभ्यो नमः । कुलदेवताभ्यो नमः । ग्रामदेवताभ्यो नमः । स्थानदेवताभ्यो नमः । वास्तुदेवताभ्यो नमः । मातृपितृभ्यां नमः । श्रीउमामहेश्वराभ्यां नमः । श्रीलक्ष्मीनारायणाभ्यां नमः । सर्वेभ्यो देवेभ्यो नमः । सर्वेभ्यो ब्राह्मणेभ्यो नमः । आदित्यादिनवग्रहदेवताभ्यो नमः । निर्विघ्नमस्तु ।**

## संकल्प -

(उजव्या हातात पळीभर पाणी घेऊन संकल्प म्हणावा व शेवटी पाणी ताम्हनात सोडावे.)

मम इह जन्मनि जन्मान्तरे च अखंडितसौभाग्यसिद्धिपूर्वक पुत्रपौत्रभर्त्रायुरारोग्यैश्वर्यादिसुखप्राप्तये सर्व मनोरथसिद्ध्यर्थ श्रीब्रह्मसाविञ्यादिदेवताप्रीत्यर्थ यथामीलितोपचारैः श्रीसत्य-वत्सहितवटसावित्रिदेवता पूजां करिष्ये। तत्रादौ निर्विघ्नता-सिद्ध्यर्थ महागणपति स्मरणं कलश-घंटा-दीपपूजनं च करिष्ये।

## गणपतिस्मरण-पूजा -

हात जोडून प्रार्थना करावी.

गणानां त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनामुपमश्रवस्तमम्। ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत आ नः शृण्वन्नूतिभि सीदसादनम्।

वक्रतुण्ड महाकाय कोटिसूर्यसमप्रभ। निर्विघ्नं कुरु मे देव शुभकार्येषु सर्वदा।

श्रीमहागणपतये नमः। निर्विघ्नं कुरु।

(गणपती म्हणून पाटावर मांडलेल्या तांदुळावरील सुपारीवर फुलाने पाणी शिंपडावे. गंध-अक्षता-फूल वाहावे. दूर्वा वाहाव्यात. उदबत्ती व नंतर निरांजन ओवाळावे. गूळ-खोबऱ्याचा नैवेद्य ठेवावा. उजव्या हातावरून ताम्हनात पाणी सोडावे. विडा-दक्षिणा ठेवावी. खारीक, बदाम व फळे ठेवावीत. उजव्या हातावरून पळीने पाणी सोडावे. नमस्कार करावा.)

कार्यं मे सिद्धिमायान्तु प्रसन्ने त्वयि धातरि।
विघ्नानि नाशमायान्तु सर्वाणि सुरनायक।

(उजव्या हातावरून ताम्हनात पाणी सोडावे.)

अनया पूजया सकलविघ्नहर्ता महागणपतिः प्रीयताम्।



## कलशपूजन -

(पाणी भरलेल्या कलशाला गंधाक्षता लावलेले फूल चिकटवावे.)

कलशस्य मुखे विष्णुः कंठे रुद्रः समाश्रितः।
मूले तत्र स्थितो ब्रह्मा मध्ये मातृगणाः स्मृताः ॥१॥
कुक्षौ तु सागराः सर्वे सप्तद्वीपा वसुंधरा।
ऋग्वेदोऽथ यजुर्वेदः सामवेदो ह्यथर्वणः ॥२॥
अंगैश्च सहिताः सर्वे कलशं तु समाश्रिताः।
अत्र गायत्री सावित्री शांतिः पुष्टिकरी तथा ॥३॥
आयान्तु देवपूजार्थं दुरितक्षयकारकाः।
गंगे च यमुने चैव गोदावरि सरस्वति।
नर्मदे सिंधु कावेरि जलेऽस्मिन्सन्निधिं कुरु ॥४॥
कलशाय नमः। सर्वोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि।

## घंटापूजन -

(घंटेला स्नान घालून ती पुसून उजव्या बाजूस ठेवावी. घंटानाद करून तीवर गंधाक्षता, फूल व हळदकुंकू वाहावे.)

आगमार्थ तु देवानां गमनार्थ तु रक्षसाम्।
कुर्वे घंटारवं तत्र देवताह्वानलक्षणम् ॥
घंटायै नमः। गंधाक्षतपुष्पं हरिद्राकुंकुमं च समर्पयामि।

## दीपपूजन -

(समईला गंधफूल, अक्षता व हळदकुंकू वाहून वंदन करावे. उदबत्ती व निरांजन लावावे.)

भो दीप ब्रह्मरूपस्त्वं ज्योतिषां प्रभुरव्ययः।
आरोग्यं देहि पुत्रांश्च सर्वार्थांश्च प्रयच्छ मे।

यावत्पूजा समाप्तिः स्यात्तावत् त्वं सुस्थिरो भव ॥
दीपदेवताभ्यो नमः।
गंधाक्षतपुष्पं हरिद्राकुंकुमं च समर्पयामि।

## प्रोक्षण -

(पूजन केलेल्या कलशातील पाणी भांड्यात ओतून घ्यावे. तुलसीपत्राने पूजासाहित्यावर व स्वतःवर त्यातील पाणी प्रोक्षण करून पूजासाहित्याची व स्वतःची शुद्धी करावी.)

अपवित्रः पवित्रो वा सर्वावस्थां गतोऽपि वा।
यः स्मरेत्पुण्डरीकाक्षं स बाह्याभ्यंतरः शुचिः।

## देवताध्यान -

हातात अक्षता घेऊन मनोमन वटसावित्रीचे ध्यान करावे. अक्षता वडाच्या मुळाशी वाहाव्यात. वडाच्या मुळाशी पाणी घालावे. वडाभोवती दोरा गुंडाळावा. वडाला गंधाक्षता, फुले वाहून नमस्कार करावा. म्हणावे -

वटमूले स्थितो ब्रह्मा वटमध्ये जनार्दनः।
वटाग्रे तु शिवो देवः सावित्री वटसंस्थिता ॥
वट सिंचामि ते मूलं सलिलैरमृतोपमैः।
सूत्रेण वेष्टये भक्त्या गन्धपुष्पाक्षतैः शुभैः ॥
नमो वटाय सावित्र्यै भ्रामयेच्च प्रदक्षिणाम्।
सावित्री च वटं सम्यगेभिर्मन्त्रैः प्रपूजयेत् ॥
श्रीवटदेवतायै नमः।
गंधाक्षतपुष्पं समर्पयामि। नमस्करोमि।
पद्मपत्रासनस्थश्च ब्रह्मा ध्येयश्चतुर्मुखः।



सावित्री तस्य तु ध्येया वामोत्सङ्गगता तथा ॥
आदित्यवर्णा धर्मज्ञा साक्षमालाकरा तथा ॥
(हातात अक्षता घेऊन वडाच्या मुळाशी वाहाव्यात.)
श्रीसत्यवत्सहितवटसावित्रीदेवताभ्यां नमः।
ध्यायामि। ध्यानार्थे अक्षतान् समर्पयामि।

## आवाहन -

(आवाहनार्थ वडाला अक्षता वाहाव्यात व नमस्कार करावा.)
ब्रह्मणा सहितां देवीं सावित्री लोकमातरम्।
सत्यव्रतं च सावित्री यमं चावाहयाम्यहम् ॥
श्रीसत्यवत्सहितवटसावित्रीदेवताभ्यां नमः।
आवाहनार्थे अक्षतान् समर्पयामि।

आसन -

(आसनाच्या ठिकाणी थोड्या अक्षता वाहाव्यात.)
ब्रह्मणा सह सावित्री सत्यवत्सहिते प्रिये।
हेमासनं गृहाणेदं धर्मराज सुरेश्वर ॥
श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।
आसनार्थे अक्षतान् समर्पयामि।

## पाद्य -

(वडाच्या मुळाशी पळीभर पाणी घालावे.)
गंगाजलं समानीतं पाद्यार्थं ब्रह्मणः प्रिये।
भक्त्या दत्तं धर्मराज सावित्रि प्रतिगृह्यताम् ॥
श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।
पादयोः पाद्यं समर्पयामि।

**अर्घ्य -**

(गंधाक्षता, पुष्प, जल व सुपारी वाहावी.)

**भक्त्या समाहृतं तोयं फलपुष्पसमन्वितम्।**
**अर्घ्यं गृहाण सावित्रि मम, सत्यव्रतप्रिये।।**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**हस्तयो अर्घ्यं समर्पयामि।**
**तदर्थे पूगीफलं, गंधाक्षतापुष्पं जलं च समर्पयामि।**

**आचमन -**

(आचमन म्हणून पळीभर शुद्धोदक वाहावे.)

**सुगन्धि सहकर्पूरं सुरभि स्वादुशीतलम्।**
**ब्रह्मणा सह सावित्रि कुरुष्वाचमनीयकम्।।**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**आचमनीयं समर्पयामि।**

**स्नानं -**

(फुलाने पाणी शिंपडावे)

**गंगासरस्वतीरेवापयोष्णीनर्मदाजलैः।**
**स्नापितोऽसि मया देवि तथा शांतिं कुरुष्व मे।**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**स्नानं समर्पयामि।**

**पंचामृतस्नान -**

(दूध, दही, तूप, मध व साखर हे सारे वाहावे. शुद्धोदक शिंपडावे. अक्षता वाहाव्यात.)

**पयो दधि घृतं चैव मधुशर्करया युतम्।**
**पंचामृतेन स्नपनं क्रियतां परमेश्वरि।।**



**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः। पंचामृतस्नानं समर्पयामि। पंचामृत स्नानानंतरं शुद्धोदकस्नानं समर्पयामि। सकलपूजार्थे अक्षतान् समपर्ययामि**

**गंधोदकस्नान -**

(गंध व जल एकत्रित वाहून पुन्हा शुद्धोदक वाहावे.)

**कर्पूरैलाचन्दनादिसुगन्धिद्रव्यसंयुतम्।**
**गंधोदकं मया दत्तं स्नानार्थं प्रतिगृह्यताम्।।**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**गंधोदकस्नानं समर्पयामि। शुद्धोदकस्नानं समर्पयामि।**

**अभंगस्नान -**

अत्तर - (सुगंधी तेल किंवा अत्तर लावावे.)

**तैले पुष्पसुगन्धाढ्यं भ्रमद्भ्रमरनादितम्।**
**विलेपयामि सर्वांगे सुवर्णचषकास्थितम्।।**

**उष्णोदक -**

(पळीने कोमट पाणी वडाच्या मुळात वाहावे.)

**स्नानार्थं जलमानीतं शीतमुष्णं यथारुचि।**
**सुगन्धितं सर्वनदीतीर्थेभ्यः प्रतिगृह्यताम्।।**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**अभ्यंगस्नानं समर्पयामि।**

**पूर्वपूजा -**

(वडाला गंध, अक्षता, फूल वाहून पूजा करावी.)

**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**गंधाक्षतपुष्पं समर्पयामि।** (हळदकुंकू वाहावे.)

श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।
हरिद्रां कुंकुमं च समर्पयामि।
(घंटानाद करून उदबत्ती व निरांजन ओवाळावे.)
श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।
धूपं दीपं च समर्पयामि।

## नैवेद्य -

(पाण्याने चौकोन करून त्यावर गुळाचा नैवेद्य ठेवावा. उजव्या हातात तुलसीपत्र घ्यावे. डाव्या हाताने पळीभर पाणी त्यावर घालून ते पाणी नैवेद्याभोवती फिरवावे.)

नैवेद्यं गृह्यतां देवी भक्ति मे ह्यचलां कुरु।
ईप्सितं मे वरं देहि परत्र च परां गतिम्॥
श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।
गुडखाद्यनैवेद्यं समर्पयामि।
ॐ प्राणाय स्वाहा। ॐ अपानाय स्वाहा।
ॐ व्यानाय स्वाहा। ॐ उदानाय स्वाहा।
ॐ समानाय स्वाहा। ॐ ब्रह्मणे स्वाहा।
नैवेद्यमध्ये पानीयं समर्पयामि। पुनर्नैवेद्यं समर्पयामि।

(पळीभर पाणी उजव्या हातावरून ताम्हनात सोडावे. पुन्हा प्रत्येक स्वाहाकाराला वटसावित्रीला उजव्या हाताने घास देण्याची कृती करावी.)

ॐ प्राणाय स्वाहा। ॐ अपानाय स्वाहा।
ॐ व्यानाय स्वाहा। ॐ उदानाय स्वाहा।
ॐ समानाय स्वाहा। ॐ ब्रह्मणे स्वाहा।

(एकेक पळी पाणी उजव्या हातावरून सोडावे आणि म्हणावे -)



उत्तरापोशनं समर्पयामि। मुखप्रक्षालनं समर्पयामि।
हस्तप्रक्षालनं समर्पयामि।
(फुलाला गंधाक्षता लावून ते अर्पण करावे.)
श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।
करोद्वर्तनार्थे चंदनं समर्पयामि।

## तांबूल - दक्षिणा -

विड्याची (दोन पाने, त्यांवर सुपारी व दक्षिणा ठेवून पाणी सोडावे.)
श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।
मुखवासार्थे पूगीफलतांबूलं समर्पयामि।
दक्षिणां समर्पयामि।

## प्रार्थना -

(उजव्या हाताने पळीभर पाणी ताम्हनात सोडून नमस्कार करावा.)

अनेन पूर्वाराधनेन श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताः प्रीयन्ताम्।

(फुले काढून उत्तरेकडे ठेवावीत. येथे पूर्वपूजा समाप्त झाली.)

## अभिषेक -

ॐ देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्यामग्नेस्तेजसा सूर्यस्य वर्चसेंद्रस्येंद्रियेणाभिषिंचामि। बलाय श्रियै यशसेऽन्नाद्याय॥ ॐ भूर्भुवः स्वः। अमृताभिषेकोऽस्तु। शांतिः पुष्टिस्तुष्टिश्चास्तु।
श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।
अभिषेकस्नानं समर्पयामि। शुद्धोदकस्नानं समर्पयामि।

## मांगलिकस्नान -
(अभिषेकानंतर मांगलिकस्नान घालण्यासाठी सुगंधी अत्तर, गंध लावून उष्णोदक वाहावे. पळीभर पाणी निरांजनावर गरम करून वाहावे.)

**काश्मीरागरुकस्तूरी कर्पूरमलयान्वितम्।**
**उद्वर्तनं मया दत्तं स्नानार्थं प्रतिगृह्यताम्॥**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**मांगलिकस्नानं समर्पयामि।**

## वस्त्र -
(कापसाची वस्त्रे वाहावीत.)

**सूक्ष्मतन्तुमयं वस्त्रयुग्मं कार्पाससम्भवम्।**
**सावित्रीसत्यवद्भ्यां च भक्त्या दत्तं प्रतिगृह्यताम्॥**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**कार्पासवस्त्रं समर्पयामि।**

## यज्ञोपवीत -
(यज्ञोपवीत (जानवे) घालावे. नंतर पळीने पाणी वडाच्या मुळात वाहावे.)

**सावित्रि, सत्यवत्कान्ते धर्मराज-सुरेश्वरि।**
**सावित्रि ब्रह्मणा सार्धमुपवीतं प्रतिगृह्यताम्॥**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**यज्ञोपवीतं समर्पयामि।**
**यज्ञोपवीतानंतरं आचमनीयं समर्पयामि।**



## गंध -
(गंध लावावे.)

**कुंकुमागरुकर्पूरकस्तूरीरोचनायुतम्।**
**चन्दनं ते मया दत्तं सावित्रि प्रतिगृह्यताम्॥**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**विलेपनार्थे चंदनं समर्पयामि।**

## अक्षता -
(अक्षता वाहाव्यात.)

**अक्षताश्च सुरश्रेष्ठे कुंकमाक्ताः सुशोभनाः।**
**मया निवेदिता भक्त्या गृहाण परमेश्वरि।**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**अक्षतान् समर्पयामि।**

## हळद - कुंकू - शेंदूर - काजळ -
(हळद, कुंकू, शेंदूर व काजळ वाहावे.)

**हरिद्रां कुंकुमं च सिंदूरं कज्जलान्वितम्।**
**सौभाग्यद्रव्यसंयुक्तं सावित्रि प्रतिगृह्यताम्।**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**हरिद्राकुंकुमादिसौभाग्यद्रव्याणि समर्पयामि।**

## मंगळसूत्र -
(छोटे मंगळसूत्र वाहावे.)

**मांगल्यतंतुमणिभिर्मुक्ताफलविराजितम्।**
**कण्ठस्य भूषणार्थाय कण्ठसूत्रं प्रतिगृह्यताम्॥**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**कंठसूत्रं समर्पयामि।**

## कंकण -

(काचेच्या छोट्या बांगड्या वाहाव्यात.)

**काचस्य निर्मितं दिव्यं कंकणं च सुरेश्वरि।**
**हस्तालंकरणार्थाय कंकणं प्रतिगृह्यताम्॥**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**कंकणं समर्पयामि।**

## परिमलद्रव्ये -

(अष्टगंध, अत्तर इत्यादी परिमलद्रव्ये वाहावीत.)

**देवमातर्नमस्तुभ्यं सावित्रि, ब्रह्मणः प्रिये।**
**नानापरिमलद्रव्यं गृहाण परमेश्वरि॥**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**नाना परिमलद्रव्याणि समर्पयामि।**

## पुष्पे -

(फुले वाहावीत. बेल व तुलसी वाहावी.)

**माल्यादीनि सुगंधीनि मालत्यादीनि वै देवते।**
**मयाहृतानि पुष्पाणि गृहाण परमेश्वरि॥**
**बिल्वप्रवालतुलसीदलमालतीभिस्।**
**त्वां पूजयामि जगदीश्वरि मे प्रसीद॥**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**यथाकालोद्भव विविधपुष्पाणि समर्पयामि।**

## अंगपूजा

(त्या-त्या अवयवांवर पुढीलप्रमाणे नाममंत्राने कुंकुमाक्षता वाहाव्यात.)



## सावित्रीची पूजा -

**सावित्र्यै नमः। पादौ पूजयामि।** (पाय)
**वटप्रियायै नमः। जानुनी पूजयामि।** (ढोपरे)
**कमलपत्राक्ष्यै नमः। कटी पूजयामि।** (कंबर)
**भूतधारिण्यै नमः। उदरं पूजयामि।** (पोट)
**ब्रह्मणः प्रियायै नमः। मुखं पूजयामि।** (मुख)
**गायत्र्यै नमः। कंठं पूजयामि।** (कंठ)
**सौभाग्यदात्र्यै नमः। शिरं पूजयामि।** (मस्तक)

## सत्यवानाची पूजा -

धात्रे नमः। पादौ पूजयामि। (पाय)
विधात्रे नमः। ऊरू पूजयामि। (मांड्या)
त्वष्ट्रे नमः। कटी पूजयामि। (कंबर)
प्रजापतये नमः। नाभिं पूजयामि। (नाभी)
परमेष्ठिने नमः। हृदयं पूजयामि। (हृदयस्थान)
अग्निरूपाय नमः। कंठं पूजयामि। (कंठ)
पद्मनाभाय नमः। स्कंधौ पूजयामि। (खांदे)
वेधसे नमः। बाहू पूजयामि। (दोन्ही हात)
विधये नमः। मुखं पूजयामि। (मुख)
हिरण्यगर्भाय नमः। ललाटं पूजयामि। (कपाळ)
ब्रह्मणे नमः। शिरः पूजयामि। (शीर्ष)
विष्णवे नमः। सर्वांगं पूजयामि। (सर्वांगावर)

## धूप -

(डाव्या हाताने घंटा वाजवावी. उजव्या हाताने धूपारतीने ओवाळावे.)

**देवद्रुमसोद्भूतः कालागरुसमन्वितः।**
**आघ्राणर्थमयं धूपः सावित्रि प्रतिगृह्यताम्।।**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**धूपं समर्पयामि।।**

## दीप -

(डाव्या हाताने घंटा वाजवावी. उजव्या हाताने निरांजन ओवाळावे.)

**चक्षुर्दं सर्वलोकानां तिमिरस्य निवारणम्।**
**आर्तिक्यं कल्पितं भक्त्या गृहाण परमेश्वरि।।**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**दीपं समर्पयामि।**

## नैवेद्य -

(पाण्याने चौकोन करून त्यावर फळांचा नैवेद्य ठेवावा. उजव्या हातात तुलसीपत्र घ्यावे. डाव्या हाताने पळीभर पाणी त्यावर घालून ते पाणी नैवेद्याभोवती डावीकडून उजवीकडे फिरवावे. नैवेद्यासाठी आंबे, केळी इत्यादी फळे ठेवावीत.)

**अन्नं चतुर्विधं स्वादु रसैः षडभिः समन्वितम्।**
**मया निवेदितं भक्त्या नैवेद्यं प्रतिगृह्यताम्।।**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**आम्रफलादि नैवेद्यं समर्पयामि।**



**ॐ प्राणाय स्वाहा। ॐ अपानाय स्वाहा।**
**ॐ व्यानाय स्वाहा। ॐ उदानाय स्वाहा।**
**ॐ समानाय स्वाहा। ॐ ब्रह्मणे स्वाहा।**
**उत्तरापोशनं समर्पयामि। मुखप्रक्षालनं समर्पयामि।**
**हस्तप्रक्षालनं समर्पयामि।**

(तीन पळ्या पाणी ताम्हनात सोडावे.)

**करोद्वर्तनार्थे चंदनं समर्पयामि।**

(फुलाला गंधाक्षता लावून ते अर्पण करावे.)

## तांबूल -

(विडा व सुपारी ठेवून उजव्या हातावरून एक पळी पाणी त्यावर सोडावे.)

**पूगीफलं महद्दिव्यं नागवल्ल्यादलैर्युतम्।**
**कर्पूरैलासमायुक्तं तांबूलं प्रतिगृह्यताम्।।**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**मुखवासार्थे पूगीफलतांबूलं समर्पयामि।**

## महादक्षिणा -

(दक्षिणा समर्पण करताना त्या द्रव्यावर (नाण्यावर) तुलसीदल व एक पळी पाणी सोडावे.)

**हिरण्यगर्भगर्भस्थं हेमबीजं विभावसोः।**
**अनंतपुण्यफलदमतः शांतिं प्रयच्छ मे।।**
**श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।**
**महादक्षिणां समर्पयामि।**

## काडवाती -
(काडवाती लावून ओवाळाव्या.)
चंद्रादित्यौ च धरणी विद्युदग्निस्तथैव च।
त्वमेव सर्वज्योतींषि आर्तिक्यं प्रतिगृह्यताम्॥
श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।
महानीरांजनदीपं समर्पयामि।

## कापूरारती -
(कापूर प्रदीप्त करून ओवाळावा.)
कर्पूरदीपं सुमनोहरं शुभे ददामि ते देवि मयि प्रसीद।
पापांधकारं त्वरित निवारय प्रज्ञानदीपं मनसि प्रदीपय॥
श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।
कर्पूरार्तिक्यदीपं समर्पयामि। (नमस्कार करावा.)

## प्रदक्षिणा -
(वडाला प्रदक्षिणा घालाव्यात. घरी पूजा केली असेल तर स्वतःभोवती उजवीकडून डावीकडे फिरावे. हात जोडावे.)
यानि कानि च पापानि जन्मान्तरकृतानि च।
तानि तानि विनश्यन्ति प्रदक्षिणपदे पदे॥
श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।
प्रदक्षिणां समर्पयामि।

## नमस्कार -
नमोऽस्त्वनंताय सहस्रमूर्तये सहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे।
सहस्रनाम्ने पुरुषाय शाश्वते सहस्रकोटियुगधारिणे नमः॥
श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।
नमस्कारान् समर्पयामि।



## पुष्पांजलि -
(पुष्पाक्षता वाहून म्हणावे -)
नमो ब्रह्मण्यदेवि त्वं सततं ब्रह्मणः प्रिये।
पूजिताऽसि द्विजैः सर्वैः स्त्रीभिर्मुनिगणैः सदा॥
त्रिसन्ध्यं देवि भूतानां वन्दनीया सुशोभने। मया दत्ता च पूजेयं गृह्यतां परमेश्वरि॥
श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।
मन्त्रपुष्पं समर्पयामि।

## अर्घ्यप्रदान -
(उजव्या हातावर काही द्रव्य व सुपारी घेऊन गंध, अक्षता, फुले घेऊन त्यावर पळीने पाणी घालून सर्व अर्घ्य खाली सोडावे. असे तीन वेळा करावे.)

१) ओङ्कारपूर्वके देवि, सर्वदुःखनिवारिणी।
वेदमातर्नमस्तुभ्यं सौभाग्यं च प्रयच्छ मे॥
श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।
सावित्र्यै नमः। इदमर्घ्यं समर्पयामि।

२) पतिव्रते महाभागे ब्रह्माणि च शुचिस्मिते।
दृढव्रते दृढमते भर्तुश्च प्रियवादिनि॥
अवैधव्यं च सौभाग्यं देहि त्वं मम सुव्रते।
पुत्रान् पौत्रांश्च सौख्यं च गृहाणार्घ्यं नमोऽस्तु ते॥
श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।
सावित्र्यै नमः। इदमर्घ्यं समर्पयामि।

३) त्वया दृष्टं जगत्सर्वं सदेवासुरमानुषम्।
सत्यव्रतधरो देव ब्रह्मरूप नमोऽस्तु ते॥

श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।
ब्रह्मसत्यवद्भ्यां नमः। इदमर्घ्यं समर्पयामि।
४) त्वं कर्मसाक्षी लोकानां शुभाशुभ विवेककृत।
वैवस्वत गृहाणार्घ्यं धर्मराज नमोऽस्तु ते।।
श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवताभ्यां नमः।
श्रीयमाय नमः। इदमर्घ्यं समपर्ययामि।

## प्रार्थना -

(हातात अक्षता व फुले घेऊन हात जोडावे. वटसावित्रीची प्रार्थना करावी.)

सावित्री ब्रह्मसावित्रि सर्वदा प्रियभाषिणि।
तेन सत्येन मां पाहि दुःखसंसारसागरात्।।
त्वं गौरी त्वं शची लक्ष्मीस्त्वं प्रभा चंद्रमंडले।
त्वमेव च जगन्माता त्वमुद्धर वरानने।।
यन्मया दुष्कृतं सर्वं कृतं जन्मशतैरपि।
भस्मीभवतु तत् सर्वम् अवैधव्यं च देहि मे।।
यथा ते न वियोगोऽस्ति भर्त्रा सह सुरेश्वरि।
तया मम महाभागे कुरु त्वं जन्मजन्मनि।।
मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वरि।
यत्कृतं तु मया देवि परिपूर्णं तदस्तु मे।।
अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम।
तस्मात्कारुण्यभावेन रक्षस्व परमेश्वरि।।
अपराधसहस्राणि क्रियन्तेऽहर्निशं मया।
दासोऽयमिति मां मत्वा क्षमस्व परमेश्वरि।।



गतं पापं गतं दुःखं गतं दारिद्र्यमेव च।
आगता सुखसंपत्तिः पुण्याश्च तव दर्शनात्।।
रूपं दहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि।
पुत्रान् देहि धनं देहि सर्वान्कामांश्च देहि मे।।
यस्य स्मृत्या च नामोक्त्या तपः पूजाक्रियादिषु।
न्यूनं संपूर्णतां याति सद्यो वंदे तमच्युतम्।।
(हातांतील अक्षता व फुले वाहावीत. नमस्कार करावा.)
अनेन यथाज्ञानेन यथामीलितोपचारद्रव्यैः।
कृतपूजनेन श्रीसत्यवत्सहितवटसावित्रिदेवते प्रीयताम्।
(उजव्या हातावरून पूजासमातीचे पळीभर पाणी ताम्हनात सोडावे.)
।। ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु।।

## सौभाग्यवायन -

(पूजा सांगण्यासाठी ब्राह्मणाला बोलावले असल्यास पूजिकेने संकल्प म्हणावा.)

अद्य पूर्वोच्चरित - वर्तमान - एवंगुणविशेषण - विशिष्टायां शुभपुण्यतिथौ मम आत्मनः सकलशास्त्रपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं श्रीवटसावित्रिव्रतपूजा - साङ्गतासिद्ध्यर्थं च ब्राह्मणाय वायनप्रदानं करिष्ये।

ब्राह्मणाला गंध फूल, अक्षता, विडा व नारळ देऊन, दक्षिणा द्यावी त्याला वायन देऊन नमस्कार करावा व त्याचा आशीर्वाद घ्यावा. पूजा सांगण्यासाठीं ब्राह्मण उपलब्ध नसल्यास किंवा या पुस्तकावरून पूजा केली असल्यास ब्राह्मणाला फळे, दक्षिणा नेऊन द्यावी. नमस्कार करून आशीर्वाद घ्यावा.

## श्रीवटसावित्रीची आरती

अश्वपती पुसता झाला। नारद सांगताती तयाला। अल्पायुषी सत्यवंत। सावित्रीनें कां प्रणीला। आणखी वर वरी बाळें। मनीं निश्चय जो केला। आरती वडराजा।।१।। दयावंत यमदूजा। सत्यवंत ही सावित्री। भावे करीन मी पूजा। आरती वडराजा।।ध्रु०।। ज्येष्ठमास त्रयोदशी। करिती पूजन वडाशी। त्रिरात्र व्रत करूनियां। जिंकी तूं सत्यवंताशी। आरती वडराजा।।२।। स्वर्गावरी जाऊनियां। अग्निखांब कचळीला। धर्मराज उचकला। हत्या घालील जीवाला। येई गे पतीव्रते पती नेई गे आपुला। आरती वडराजा।।३।। जाऊनीया यमापाशीं। मागतसे आपला पती। चारी वर देऊनीया। दयावंत द्यावा पती। आरती वडराजा।।४।। पतिव्रते तुझी कीर्ती। ऐकूनी ज्या नारी। तुझी व्रतें आचरती। तुझी भुवनें पावती। आरती वडराजा।।५।। पतिव्रते तुझी स्तुती। त्रिभुवनी ज्या करिती। स्वर्गी पुष्पवृष्टी करूनिया। आणिलासी आपुला पती। अभय देऊनीया। पतिव्रते तारी त्यासी। आरती वडराजा।।६।।

* * *

प्रकाशक महेंद्र मधुकर कस्तुर
**तुकाराम बुक डेपो,** १७, माधवबाग, सी. पी. टँक, मुंबई-४
अक्षरजुळणी : अक्षय फोटोटाईपसेटर्स, ठाणे (पश्चिम)
प्रतिरूप छपाई : शिवानी प्रिंटर्स, खाडिलकर मार्ग, गिरगाव, मुंबई-४
नवीन आवृत्ती : २०१३




आमच्या येथे सर्व प्रकारची धार्मिक, अध्यात्मिक, ज्योतिष व शालेय पुस्तके तसेच नविन वर्षाच्या दिनदर्शिका व डायऱ्या होलसेल व किरकोळ दराने मिळतील.

# तुकाराम बुक डेपो

माधव बाग, मुंबई - ४०० ००४.

दूरध्वनी : २२४२१६८९

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni Galleria CHS., Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai - 400043.

hariom astrologers
hariom astrologers
hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com
www.hariomastrologers.com